महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका//न.क्र.०५
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. : ०२२ - ६९४२५१४१

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ६६८ दि. १४.०३.२०२४

**विषय :** बाहयस्त्रोताद्वारे कंत्राटी पध्दतीवर कार्यरत कंत्राटी कामगारांचा प्राणांतिक अपघात झाल्यास मानवतावादी दृष्टीकोनातून कंत्राटी कामगारांच्या वारसास कंपनीकडून तातडीची आर्थिक मदत अदा करणेबाबत.

**संदर्भ :** प्रशासकीय परिपत्रक क्र.१९२ दि.२०.११.२००८.

-----

प्रशासकीय परिपत्रक क्र.५३३ दि.०९.०३.२०१६ अन्वये महावितरण कंपनीच्या बाहेरील व्यक्तींचा विद्युत धक्क्यामुळे प्राणांतिक अपघात झाल्यास त्यांना कंपनीच्या वतीने रु. ४,००,०००/- (रु.चार लाख मात्र) तातडीची आर्थिक मदत देण्यात येते. याच धर्तीवर बाहयस्त्रोताद्वारे कंत्राटी पध्दतीवर कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांना कंपनीचे काम करीत असतांना प्राणांतिक अपघात झाल्यास मयत कंत्राटी कामगारांच्या वारसांना तातडीची आर्थिक मदत देण्याबाबतची बाब कंपनीच्या विचाराधीन होती.

२. आता, अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) आणि संचालक (मासं) यांच्याशी विचारविनियम करुन महावितरण कंपनीमध्ये बाहयस्त्रोताद्वारे कंत्राटी पध्दतीवर कार्यरत कंत्राटी कामगारांचा प्राणांतिक अपघात झाल्यास मानवतावादी दृष्टीकोनातून कंत्राटी कामगारांच्या वारसास **रु. ४,००,०००/- (रु.चार लाख मात्र)** इतकी तातडीची आर्थिक मदत कंपनीकडून कंत्राटदारा मार्फत संबंधित नियंत्रण अधिकारी यांच्या उपस्थितीत अदा करण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे.

३. उपरोक्तपणे तातडीची आर्थिक मदत प्रशासकीय परिपत्रक क्र.१९२ दि.२०.११.२००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार देण्यात यावी. तसेच सदर आर्थिक मदत संबंधीत कंत्राटी कामगारास प्राणांतिक अपघात ज्या मंडलांतर्गत कार्यरत असतांना झालेला आहे अशा मंडलाचे अधीक्षक अभियंता त्या मंडलाचे वरिष्ठ व्यवस्थापक (विवले)/ व्यवस्थापक (विवले) यांच्याशी विचारविनियम करुन मंजूर करण्यास सक्षम अधिकारी असतील.

४. सदरचा निर्णय हा केवळ तातडीच्या मदतीपुरता मर्यादित असून कंपनीवर इतर कोणतीही आर्थिक जबाबदारी राहणार नाही. मयत कमगाराची सर्व अनुषंगिक व इतर योजनेअतंर्गत अनुज्ञेय असलेली देयके कंत्राटदारांनी अदा करावीत. तसेच मंजूर करण्यात आलेली तातडीची मदत ही मयत कामागाराच्या वारसास अदा करण्यात आली आहे या बाबतची कागदोपत्री खातरजमा संबंधित मंडल कार्यालयाकडून करण्यात यावी व त्याबाबतची प्रकरणपरत्वे माहीती संबंधीत उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांनी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, सांघिक कार्यालय, मुंबई यांचे कडे ०७ दिवसात सादर करावी.

५. उपरोक्त तातडीची आर्थिक मदत अदा करण्याकरीता सर्व आहरण व वितरण अधिकारी यांनी SAP प्रणालीमध्ये "४०५००४०२" या GL Code चा वापर करावा.

६. सदरचे प्रशासकीय परिपत्रक निर्गमित झालेल्या तारखेपासून अंमलात येईल.

७. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या E-library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

( भूषण कुलकर्णी )
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

प्रत सविनय सादर:
१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/(मासं)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(देयके व वसूली)/(वितरण)/ (वित्त व लेखा) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

प्रत सस्नेह रवाना:

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी अधिकारी/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
५) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

प्रत रवाना:

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.